# महिला व बालविकास आयुक्तालय

२८,राणीचा बाग ,जुन्या सर्किट हाउस शेजारी ,पुणे ०१.

Email: Commissionerwcdest@yahoo.in दुरध्वनी क्र. २०-२६३३३८१२

## प्रसिध्दीपत्रक

१. आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिनस्त आस्थापनेवरील संरक्षण अधिकारी (कनिष्ठ), गट-क या संवर्गातील १७ रिक्त पदे भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडुन दि.८-१२-२०२५ ते दि.२२-१२-२०२५ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आलेले होते. सदर भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने **कॉम्पुटरबेस्ड वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची ऑनलाईन परीक्षा दि.३०-१-२०२६ रोजी** आयोजीत करण्यात येणार आहे.

२. उमेदवारांना दि.२४-०१-२०२६ पासून प्रवेशपत्र ऑनलाईन पध्दतीने https://www.Wcd commpune.com या संकेतस्थळावर_उपलब्ध करून देण्यात येणार आहे. उमेदवारांनी त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन प्रवेश पत्र उपलब्ध करुन घ्यावयाचे आहे. सदर प्रवेशपत्रामध्ये परीक्षेचे वेळ व तारीख, परीक्षा केंद्र,सूचना व इतर महत्वाच्या आवश्यक माहितीचा समावेश आहे. उमेदवारांनी प्रवेशपत्रामध्ये नमुद सर्व सुचनांची अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील.उमेदवार ऑनलाईन परीक्षेस कोणत्याही कारणास्तव अनुपस्थित राहिल्यास त्यांना ऑनपरीक्षेकरीता पुनश्च: संधी देण्यात येणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी

३. **दिव्यांग उमेदवार** -लेखनिक व अनुग्रह कालावधीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना सरळसेवा भरती प्रक्रियेच्या सविस्तर जाहिरातीमध्ये नमुद करण्यात आलेल्या आलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनेनुसार, दिव्यांग उमेदवारांनी आवश्यक त्या सर्व मुळ कागदपत्रांसह परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे.

४. ऑनलाईन अर्जांची संख्या, परीक्षा केंद्राची क्षमता व संबधित उमेदवारांनी परीक्षा केंद्राकरीता सादर केलेले विकल्प विचारात घेवून संबधित उमेदवारांचे परीक्षा केंद्र निश्चित केलेले आहे. त्यामुळे **परीक्षेची वेळ, दिनांक व परीक्षा केंद्र बदलण्यासंदर्भातील कोणतेही निवेदने विचारात घेण्यात येणार नाही याबाबत सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

५. **ऑनलाईन परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी प्रश्नसंच चार गटांमध्ये विभागण्यात येणार आहे. उमेदवारांनी प्रत्येक गटातील प्रश्न ठराविक वेळेतच सोडविणे अनिवार्य राहील.विहीत वेळेनंतर पुढील गटातील प्रश्नसंच सोडविण्यासाठी उपलब्ध होणार आहेत.उमेदवारांनी एका गटातील प्रश्न सोडविण्याचा कालावधी संपल्यानंतर त्याच गटातील उत्तरे सोडविण्यासाठी पुनश्च: संधी देण्यात येणार नाही.**

| Group Name | | | |
|---|---|---|---|
| Group A | Group B | Group C | Group D |
| 25 Questions | 25 Questions | 25 Questions | 25 Questions |
| 30 Minutes | 30 Minutes | 30 Minutes | 30 Minutes |

**६. उमेदवारांना ऑनलाईन प्रश्नपत्रिका सोडविण्याचा सराव करण्यासाठी MOCK TEST LINK सदर भरती प्रक्रियेच्या https://www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.सदर सुविधेचा लाभ घेण्याबाबत सर्व उमेदवारांना आवाहन करण्यात येत आहे.**

**७.** उमेदवारांना प्रश्नसंच किंवा उत्तरतालिका या संदर्भात आक्षेप/निवेदन सादर करावायचे असल्यास त्याबाबत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबतची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्या संदर्भातील वेळापत्रक यथावकाश प्रसिध्द करण्यात येत आहे. **प्रश्नसंच किंवा उत्तरतालिका या संदर्भात आक्षेप केवळ ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारण्यात येणार आहेत इतर कोणत्याही पध्दतीने सादर केलेले (पत्राव्दारे,ईमेल,मेसेजेस) आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.**

**८.** सदर भरती प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने पार पाडण्यात येत असून उमदेवारांनी कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये.तसेच कोणत्याही व्यक्तीने सदर भरती प्रक्रियेबाबत **गैरमार्गाने नोकरी देण्याचे/परीक्षा पास करुन देण्याचे किंवा तत्सम स्वरुपाचे आमिष दाखविल्यास अशा भूलथापांना बळी न पडता त्याबाबत नजीकच्या पोलीस स्टेशनकडे तात्काळ संपर्क करावा.**

९. भरती प्रक्रियेशी संबधीत अधिकृत माहितीकरीता महिला व बाल विकास विभागाच्या **https://www.wcdcommpune.com** संकेतस्थळाला वेळोवेळी भेट दयावी. तसेच भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या भ्रमणध्वनी व ईमेल वेळोवेळी पाठविण्यात येणा-या सूचनांचे उमेदवारांनी पालन करावे.

**१०.** सदर भरती प्रक्रियेशी संबधीत हॉल टिकीट ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करून घेताना **तांत्रिक अडचणी आल्यास संबधीत उमेदवारांनी ७३ ५३ ०० ९० ९४ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क करावा. सदर टोल फ्री क्रमांक सोमवार ते शनिवारी सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० या कालावधीत सुरु राहील.**

दिनांक :- १९/०१/२०२६
स्थळ :- पुणे

**(नयना अर्जुन मुंडे) भा.प्र.से**
**आयुक्त**
**महिला व बाल विकास**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**